मुख्य कार्यालय, विरार
विरार (प),
ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र. : व.वि.श.म./ /
दि. ३०/१०/२०२६

वसई-विरार शहर महानगरपालिका

परिवहन विभाग

परिवहन समिती सभापती पदी श्री.अशोककुमार दत्ता रणखांब यांची निवड

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या परिवहन समिती सभापती पदाची निवड करण्यासाठी वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या परिवहन समितीची मा.विशेष सभा शुक्रवार दि.३०/१०/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता वसई-विरार शहर महानगरपालिका मुख्यालय, स्थायी समिती सभागृह, ४ था मजला, यशवंत नगर, विरार (प.) येथे मा.पीठासीन अधिकारी मा.डॉ.इंदुराणी जाखड (भा.प्र.से.) जिल्हाधिकारी पालघर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी झालेल्या निवड प्रक्रियेत श्री.अशोककुमार दत्ता रणखांब यांची वसई विरार शहर महानगरपालिका परिवहन समिती सभापती बिनविरोध निवड झाली.

परिवहन समिती सभापती पदी पदासाठी परिवहन समिती सदस्य श्री.अशोककुमार दत्ता रणखंब यांचे एकमेव नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले होते. मा.पीठासीन अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत परिवहन समिती सभापती पदाची निवडणूक प्रक्रिया नियमानुसार संपन्न झाल्यानंतर मा.पीठासीन अधिकारी यांनी वसई विरार शहर महानगरपालिकेच्या परिवहन समिती सभापती पदी श्री.अशोककुमार दत्ता रणखांब यांची एका वर्षाकरिता निवड झाल्याचे जाहीर केले.

यावेळी महानगरपालिका स्थायी समिती सभापती तथा परिवहन समितीचे पदसिद्ध सदस्य श्री.प्रवीण शेट्टी, परिवहन समितीचे सदस्य श्री.अशोककुमार दत्ता रणखांब, श्री.किरण तुकाराम ठाकूर, श्री.जतिन बाळकृष्ण पाटील, श्री.प्रतीक राजेंद्र जाधव, श्री.नवनाथ संभाजी शिंदे, श्री.प्रीतेश हरेश्वर पाटील, श्री.सागर भालचंद्र पाटील, श्री.राजन दीनानाथ पोतदार, श्री.दिव्यांक अशोक चौहान, श्री.रमाशंकर योगेंद्र मिश्रा, श्री.नवनाथ मनसाराम पगारे, श्री.मंथन महेश डगली, परिवहन व्यवस्थापक श्री.धैर्यशील जाधव, सह-आयुक्त नगरपालिका प्रशासन श्री.श्याम पोषट्टी, उप-आयुक्त श्रीम.हर्षला राणे, नगरसचिव श्री.विश्वनाथ तळेकर हे उपस्थित होते.

परिवहन विभाग,
वसई विरार शहर महानगरपालिका